RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ९८] शुक्रवार, सप्टेंबर ८, २०२३/भाद्रपद १७, शके १९४५ [पृष्ठे ८२, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

दिव्यांग कल्याण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ सप्टेंबर २०२३.

अधिसूचना

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६.

क्रमांक दिव्यांग-२०१७/प्र.क्र.०५/दि.क.-२.—दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (२०१६ चे ४९) च्या कलम १०१ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या नियमांचा खालीलप्रमाणे मसुदा आणि त्या अनुषंगाने त्यास सक्षम करणारे इतर सर्व अधिकार, त्याद्वारे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर कलम १०१ च्या उप-कलम (१) च्या आवश्यकतेनुसार प्रकाशित केले आहेत; आणि याद्वारे नोटीस दिली जाते की, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** ही अधिसूचना प्रकाशित झाल्यापासून तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून सदर नियमांचा मसुदा विचारात घेतला जाईल.

२. उपरोक्त नमूद कालावधीच्या समाप्तीपूर्वी किंवा त्याआधी वरील मसुद्याच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीकडून, किंवा आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (*commissioner.disability@maharashtra.gov.in*) यांना प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती किंवा सूचनांचा शासन विचार करेल.

नियमांचा मसुदा
प्रकरण - १
प्राथमिक

१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ.—

(१) या नियमांना महाराष्ट्र राज्य दिव्यांग हक्क नियम, २०२३ असे संबोधण्यात येईल.

(२) सदरचे नियम हे **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. व्याख्या.—

(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर —

(ए) "अधिनियम" म्हणजे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा ४९) असा आहे ;

(बी) "*नमुना*" म्हणजे या नियमांच्या परिशिष्ठामध्ये जोडलेला नमुना ;

(सी) "एमडीसी होम" यामध्ये अनुदानित किंवा विनाअनुदानित मेंटली डेफिशियंट चिल्ड्रेन्स निवासी गृहे तसेच बौद्धिक दिव्यांगत्व आणि / किंवा ऑटिझमसह दिव्यांगत्व असलेल्या अनाथ किंवा नाकारलेल्या आणि त्यांना कोणाचाही आधार नसलेल्या व्यक्तींसाठीच्या गृहांचा त्यामध्ये समावेश होतो;

(डी) "*अधिक्रमित अधिनियम*" म्हणजे अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा ०१) होय;

(इ) "*नियम*" म्हणजे या नियमांतर्गत असलेले नियम;

(एफ) "राज्य सल्लागार मंडळ" म्हणजे अधिनियमाच्या कलम ६६ अंतर्गत राज्य सरकारने स्थापन केलेले "महाराष्ट्र राज्य दिव्यांगत्व मंडळ" होय;

(२) यामध्ये वापरलेले परंतु परिभाषित न केलेला शब्द व शब्द प्रयोगास अधिनियमात परिभाषित केल्याप्रमाणे समान अर्थ असतील.

प्रकरण - २

दिव्यांगत्वावर शोधनासाठी राज्य समिती

३. अधिनियमाच्या कलम ६ च्या पोटकलम (२) च्या खंड (ii) नुसार स्थापन महाराष्ट्र राज्य दिव्यांगत्व संशोधन समिती.- (१) अपंगत्व संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य समिती असेल ज्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल, त्यामध्ये:-

(ए) आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य,	पदसिद्ध अध्यक्ष;
(बी) संचालक, अलीयावर जंग नॅशनल इंस्टिट्युट ऑफ स्पीच अँड हेअरिंग डिसॅबिलिटीज, (दिव्यांगजन), के.सी.मार्ग, बांद्रा (पश्चिम), रिक्लेमेशन, मुंबई – ४०० ०५०;	पदसिद्ध सदस्य;
(सी) ऑफिस इनचार्ज, नॅशनल इंस्टिट्युट फॉर द पर्सन्स विथ इंटेलेक्च्युअुल डिसफबिलिटीज (दिव्यांगजन) निप्ड, सीआरसी, बी-१०२, वसुंधरा कोऑप हौ. सोसा, पहिला मजला, प्लॉट नं. १३ व १४, सेक्टर – ८, खारघर, नवी मुंबई – ४१० २१०	पदसिद्ध सदस्य;
(डी) विभाग प्रमुख, (दिव्यांग अभ्यास केंद्र), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,गणेश खिंड रोड, पुणे	पदसिद्ध सदस्य;

(इ) संचालक, आरोग्य सेवा (मानसिक आरोग्य), सेंट जॉर्ज रूग्णालय, सीएसटी जवळ, मुंबई ;	पदसिद्ध सदस्य;
(एफ) अधिक्षक, बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, ससुन रूग्णालय आवार, पुणे ४११००१	पदसिद्ध सदस्य;
*(जी)*राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तींमधून सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या सात व्यक्ती किंवा अधिनियमाच्या कलम २ च्या कलम (झेड) अंतर्गत परिभाषित केल्यानुसार नोंदणीकृत संस्थांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य;	अशासकीय सदस्य;
*(एच)*उपआयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य,	सदस्य सचिव;.

(२) नामनिर्देशित सदस्य यांचा नियुक्तीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी सदर पदावर धारणाधिकार राहील.

(३) ज्यामध्ये संशोधन प्रस्तावित आहे, त्याकरीता अध्यक्ष हे निमंत्रित सदस्य म्हणून दिव्यांगत्वाच्या विषयातील कोणत्याही तज्ञाला बोलावू शकतील.

(४) एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्य संख्या बैठकीच्या गणपुर्तीसाठी पुरेशी असेल.

(५) समितीच्या वर्षातून दोन वेळा बैठका घेण्यात येतील, परंतु, सदर दोन बैठकांमधील अंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त राहणार नाही.

परंतु, अपवादात्मक परिस्थितीत अध्यक्ष हे सदर समितीची विशेष बैठक बोलावू शकतील.

(६) समितीचा निर्णय अंतिम असेल.

प्रकरण - ३

मर्यादित पालकत्व

४. मर्यादित पालकत्व .- (१) पदनिर्देशित प्राधिकरण आणि अपिलीय प्राधिकरणाची नियुक्ती :-

(ए) जिल्हाधिकारी हे अधिनियमातील कलम १४ च्या उपकलम (१) च्या उद्देशाकरीता पदनिर्देशित प्राधिकरण असेल.

(बी) जिल्हा न्यायाधीश हे अधिनियमातील कलम १४ च्या उपकलम (३) च्या उद्देशाकरीता अपिलीय प्राधिकरण असेल.

(२) मर्यादित पालकाची नियुक्ती आणि त्याविषयी कार्यपद्धती ;-

(ए) दिव्यांग व्यक्तीचे पालक किंवा त्याचे नातेवाईक नमुना- I मध्ये दिव्यांग व्यक्तीचे मर्यादित पालक म्हणून काम करण्यासाठी स्वत:सह त्याच्या पसंतीच्या कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी पदनिर्देशित प्राधिकरणाकडे अर्ज सादर करतील. दिव्यांग व्यक्ती स्वतःसाठी मर्यादित पालक नियुक्त करण्यासाठी थेट अर्ज करू शकते.

(बी) कोणत्याही नोंदणीकृत संस्थेस दिव्यांग व्यक्तीसाठी मर्यादित पालक नियुक्त करण्यासाठी नमुना -I मध्ये नियुक्त प्राधिकरणाकडे अर्ज देखील करता येईल:

परंतु, दिव्यांग व्यक्तीच्या पालकांची संमती घेतल्याशिवाय असा कोणताही अर्ज पदनिर्देशित प्राधिकरणाकडून स्वीकारला जाणार नाही. दिव्यांगत्व असलेल्या अनाथ व्यक्तीच्या बाबतीत त्यांच्या कायदेशीर पालकांची संमती घेतली जाईल.

(सी) मर्यादित पालकाच्या नियुक्तीसाठी अर्जाचा विचार करताना, नियुक्त प्राधिकारी विचार करेल, -

(i) अपंग व्यक्तीला मर्यादित पालकाची गरज आहे का;

(ii) जर दिव्यांग व्यक्ती स्वत:चे मत देण्यास पात्र असेल तर संबंधित दिव्यांग व्यक्तीचे मत विचारात घेईल; आणि

(iii) दिव्यांग व्यक्तीसाठी मर्यादित पालकत्व आवश्यक आहे तो उद्देश.

(डी) मर्यादित पालकत्वाच्या नियुक्तीसाठी ज्या व्यक्तीचे नाव मर्यादित पालक म्हणून नियुक्तीसाठी सुचवले गेले आहे त्यासंबंधी निर्णय घेताना, पदनिर्देशित प्राधिकरण हे याची खात्री करेल की, ती व्यक्ती -

(i) मनोविकलांग नसावी;

(ii) फौजदारी गुन्ह्यातील शिक्षेची पार्श्वभुमी नसावी ;

(iii) तो स्वतःच्यासाठी इतरांवर निर्भर नाही; आणि

(iv) नादार किंवा दिवाळखोर घोषित केलेला नाही.

(इ) पदनिर्देशित प्राधिकरण हे मर्यादित पालकत्व मंजूर करण्याबाबत अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून किंवा त्याच्या लक्षात येण्याच्या तारखेपासून, अशा मर्यादित पालकत्वाची आवश्यकता असल्यास एक महिन्याच्या कालावधीत प्राधान्याने निर्णय घेईल.

(एफ) मर्यादित पालकाच्या नियुक्तीची पुष्टी नमुना-II मध्ये केली जाईल:

परंतु, मर्यादित पालकाची नियुक्ती करताना, पदनिर्देशित प्राधिकरण मर्यादित पालकाने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या प्रदान करेल आणि मर्यादित पालकाने घेतलेला कोणताही घेतलेला निर्णय दिव्यांग व्यक्ती आणि मर्यादीत पालक यांच्या परस्पर समजूत आणि विश्वासावर आधारित असेल.

(जी) पदनिर्देशित प्राधिकरण हे दिव्यांग व्यक्तींसाठी त्यांना प्राप्त झालेल्या अर्जांचे तपशील आणि सहा महिन्यांच्या अंतराने त्यावरील आदेश राज्य आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना पाठवतील.

(३) मर्यादित पालकत्व कमी करण्याची प्रक्रिया.-

(ए) मर्यादित पालक हे नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास असफल होणे, अधिकारांचा गैरवापर, दिव्यांग व्यक्तीकडे दुर्लक्ष, अपहार किंवा स्थावर किंवा जंगम मालमत्तेकडे दुर्लक्ष किंवा इतर कोणत्याही रास्त कारणास्तव दिव्यांग असलेली व्यक्ती किंवा पालक किंवा दिव्यांग व्यक्तीचे नातेवाईक, नोंदणीकृत संस्थेकडून मर्यादित पालक काढून टाकण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर पदनिर्देशित प्राधिकरणास निर्णय घेण्यास सहाय्य करण्याकरीता तीन जणांपेक्षा कमी नसलेल्या संशोधकांच्या पथकाची पदनिर्देशित प्राधिकरणाकडून नियुक्ती केली जाईल.

(बी) पथकात जिल्हा समाज कल्याण अधिकारी, दिव्यांग व्यक्तींची संघटना किंवा नोंदणीकृत संस्थेचा एक प्रतिनिधी आणि विनिर्दिष्ट दिव्यांग प्रकारामध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींमधून पदनिर्देशित प्राधिकरणाने निर्देशित केलेली शासकीय किंवा अशासकीय कोणतीही अन्य व्यक्ती यांचा समावेश असेल.

(सी) हे पथक त्यांचा अहवाल पंधरा दिवसांत सादर करेल.

(डी) चौकशी पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, नियुक्त पालकांस सुनावणीची संधी दिल्यानंतर ज्या मर्यादित पालकांविरूद्ध तक्रार प्राप्त झाली आहे, त्यास काढून टाकण्याविषयी पदनिर्देशित प्राधिकरण हे पंधरा दिवसांच्या कालावधीत अंतिम निर्णय घेईल.

(इ) पदनिर्देशित प्राधिकरण हे मर्यादित पालकत्व कमी करण्याचे अथवा सदरचा अर्ज नाकारण्याचे सकारण आदेश पारित करेल.

(एफ) दिव्यांग व्यक्तीने स्वत: मर्यादित पालकत्व काढून टाकण्यास केलेला अर्ज प्रलंबित असताना किंवा मर्यादित पालकत्व चालू ठेवल्यामुळे दिव्यांग व्यक्तींना गंभीर आणि अपरिवर्तनीय हानी पोहोचेल याबाबत पदनिर्देशित प्राधिकरण समाधानी असल्यास, नियुक्त केलेल्या मर्यादीत पालकाला तात्काळ प्रभावाने, नोटीशीशिवाय, काढून टाकणे किंवा निलंबित करण्याचा अधिकार असेल.

(जी) मर्यादित पालकत्व काढून टाकल्यावर किंवा निलंबन केल्यावर, अशा पालकाने काम करणे थांबवले पाहिजे आणि दिव्यांग व्यक्तीशी संबंधित बाबींवर कोणताही निर्णय घेण्यास पात्र राहणार नाही.

(एच) पदनिर्देशित प्राधिकरण हे मर्यादित पालकत्व काढण्याआधी तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी विचाराधीन दिव्यांग व्यक्तींसाठी कायदेशीर पालक नियुक्त करण्याची तात्पुरती व्यवस्था करेल. त्या दरम्यान नियमित मर्यादित पालकत्वाच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

(आय) तात्पुरत्या कालावधीसाठी नियुक्त केलेला कायदेशीर पालक, पदनिर्देशित प्राधिकरणाशी सल्लामसलत केल्याशिवाय, दिव्यांग व्यक्तीशी संबंधित मालमत्ता, उपजीविका आणि इतर गंभीर बाबींबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेऊ शकणार नाही.

(४) मर्यादित पालकांकडून अहवाल.- या नियमांतर्गत नियुक्त केलेल्या प्रत्येक मर्यादित पालकाने नमुना - III मध्ये एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी किंवा मर्यादित पालकत्वाचा कालावधी संपण्यापूर्वी दोन महिन्यांच्या आत पालकावर जबाबदारी कशा प्रकारे सोपविण्यात आलेली आहे व ती कशा प्रकारे पार पाडण्यात आली याचा तपशीलवार अहवाल पदनिर्देशित प्राधिकरणाकडे सादर केला पाहिजे.

प्रकरण - ४

संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र

५. *सक्षम प्राधिकारी.-* आयुक्त, दिव्यांग कल्याण हे अधिनियमातील प्रकरण -११ च्या उद्देशांसाठी सक्षम प्राधिकारी असतील.

६. *संस्थांच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता अर्ज .- (१)* दिव्यांग व्यक्तींसाठी संस्था स्थापन करू इच्छिणाऱ्या किंवा देखरेख करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने किंवा संघटनेने नमुना-IV मध्ये आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्याकडे संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यामार्फत आणि मुंबई जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या बाबतीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या मार्फत अर्ज करेल. जर अर्जदार विविध उपक्रम राबवित असेत तर, यापैकी जशी परिस्थिती असेल, प्रत्येक युनिट, प्रत्येक उपक्रमासाठी स्वतंत्र अर्ज केला जाईल .

(२) उप-नियम (१) अन्वये केलेल्या प्रत्येक अर्जासोबत सोबतच्या परिशिष्टातील यादीत नमूद केल्याप्रमाणे, संस्थेमध्ये प्रदान केलेल्या सुविधा आणि संस्थेची मानके नमूद करणारी कागदपत्रे सादर करावी लागतील.

(३) नोंदणी प्रमाणपत्र सुरुवातीला एका वर्षाच्या कालावधीसाठी दिले जाईल आणि प्रमाणपत्राचे नूतनीकरण एकाच वेळी चार वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी मंजूर केले जाईल.

(४) उप-नियम (१) अंतर्गत प्रारंभिक प्रमाणपत्र मंजूर करण्यासाठी दिलेल्या प्रक्रियेनुसार नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज वैधता कालावधी संपण्यापूर्वी साठ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीत केला जाईल. अशा कालावधीनंतर नूतनीकरणासाठी कोणताही अर्ज दखलपात्र राहणार नाही.

(५) नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठीच्या अर्जासोबत पूर्वीच्या प्रमाणपत्रासह संस्थेमध्ये प्रदान केलेल्या सुविधा आणि संस्थेची मानके नमूद करणाऱ्या कागदपत्रांसह, यासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या यादीनुसार राहतील.

(६) जर, संस्था विहित कालावधीत नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकली नाही तर, राज्य सरकारकडून कोणत्याही अनुदानासाठी पात्र होणार नाही.

(७) नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी उप-नियम (४) अंतर्गत केलेला प्रत्येक अर्ज, प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे निकाली काढण्यात येईल.

(८) नोंदणी प्रमाणपत्र, नाकारणे आणि रद्द करण्याबाबतचा नमुना.- संस्थेच्या कामकाजाची योग्य चौकशी केल्यावर आणि शासनाने या संदर्भात वेळोवेळी नमूद केलेल्या मानकांची पुर्तता केल्यावर, संस्थेची कलम ५१ च्या तरतुदींनुसार नोंदणी करता येईल, अशी खात्री झाल्यावर, सक्षम प्राधिकारी नोंदणी प्रमाणपत्र किंवा त्याच्या नूतनीकरणासाठी यासोबत जोडलेल्या नमुना V मध्ये प्रमाणपत्र संस्थेला जारी करतील.

(९) सक्षम प्राधिकाऱ्याने उपनियम (१) अन्वये मंजूर केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि उप-नियम (४) अन्वये मंजूर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाबाबत, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डच्या स्वरूपात, कार्यालयात नोंदणी ठेवली जाईल.

७. सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाविरूध्द अपिल.- *(१)* सचिव, दिव्यांग कल्याण विभाग हे अधिनियमाच्या कलम ५३ च्या उद्देशाने अपीलीय प्राधिकारी असतील. नोंदणी प्रमाणपत्र देण्यास नकार देणे किंवा नूतनीकरण नाकारणे किंवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे या सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अपील प्राधिकरणाकडे अपील दाखल करू शकेल.

(२) अपिल प्रक्रिया.- अपिलीय प्राधिकरणासमोर दाखल करावयाचे अपिल खालील प्रमाणे आणि सोबत दाखल करावयाच्या कागदपत्रांप्रमाणे असेल,-

(ए) अपिल मेमो;

(बी) अपिलार्थी संस्थेचे नांव, संपूर्ण वर्णन आणि पत्ता;

(सी) प्रतिवादी पक्षकार किंवा पक्षकारांचे नांव, संपूर्ण वर्णन आणि पत्ता, कि ज्यामुळे त्यांची निश्चिती करता येईल;

(डी) अपिलाचे कारण, ते केव्हा आणि कुठे घडले यासह अपिलास कारण घडल्याची वस्तुस्थिती;

(इ) अपिलांत नमुद केलेल्या आरोपांच्या पुष्ठ्यर्थ पुराव्यांचे कागदपत्रे, ज्यामध्ये सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशाचा समावेश असेल;

(इ) अपिलार्थीची मागणी.

(३) अपीलकर्त्याने अपीलची प्रत, संबंधित कागदपत्रांसह, प्रतिवादी पक्षांना तीस दिवसांच्या कालावधीत आगाऊ दिली पाहिजे आणि अपील दाखल करताना त्याची पोचपावती अपीलासोबत सादर केली जाईल.

(४) अपील प्राप्त झाल्यानंतर, तीस दिवसांच्या विहित कालावधीत किंवा अपील दाखल करण्यासाठी विलंब माफ करण्यासाठी योग्य आदेश पारित केल्यानंतर, अपील प्राधिकारी हे अपीलाची नोटीस जारी करतील आणि प्रतिवादी पक्षांना लेखी म्हणणे किंवा विवरणाची मागणी करेल.

(५) अपीलाची नोटीस मिळाल्यावर, त्यांच्या म्हणण्याला समर्थन देणाऱ्या कागदपत्रांसह, पंधरा दिवसांच्या विहित कालावधीत किंवा नोटीसमध्ये नमूद केलेल्या तारखेच्या आधी प्रतिवादीत्यांचे म्हणणे किंवा निवेदन अपील प्राधिकरणासमोर लेखी स्वरूपात सादर करतील.

(६) अपीलीय प्राधिकारी, प्रतिवादी पक्षांचे लेखी म्हणणे किंवा विवरण न मागता प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीच्या आधारे, त्यांना योग्य वाटेल तसे अंतरिम आदेश किंवा निर्देश देऊ शकतील.

(७) सुनावणीच्या तारखेला किंवा सुनावणीच्या इतर कोणत्याही तारखेला पक्षकार किंवा त्यांचे योग्य अधिकृत प्रतिनिधी अपील प्राधिकरणासमोर हजर राहतील.

(८) अपीलार्थी किंवा त्यांचा प्रतिनिधी अपील प्राधिकरणासमोर विहीत दिवसांत हजर राहण्यास अपयाशी ठरल्यास, अपील प्राधिकारी एकतर अपील डिफॉल्टच्या कारणास्तव फेटाळू शकतील किंवा अपिलाच्या गुणवत्तेनुसार निर्णय घेऊ शकतील.

(९) प्रतिवादी पक्षकार किंवा त्यांचा प्रतिनिधी सुनावणीच्या तारखेला हजर राहण्यास अपयशी ठरल्यास, अपीलीय प्राधिकारी प्रतिवादी पक्षाला समन्स बजावण्यासाठी आणि हजेरी लावण्यासाठी योग्य वाटेल अशी आवश्यक कारवाई करू शकतील.

(१०) अपीलीय प्राधिकारी, वाजवी वेळ दिल्यानंतर, प्रतिवादी पक्षकार हजर होण्यास आणि/किंवा विहित तारखेला आपले लेखी निवेदन सादर करण्यास किंवा प्रक्रियेला विलंब केल्याने किंवा त्यांच्या विरुद्ध नोटीस बजावल्यानंतरही हजर राहण्यास

टाळाटाळ करण्याचे कारण घडल्यास, या संदर्भात लिखित स्वरूपात तर्कसंगत आदेश पारित करून अपील एकतर्फी निकाली काढू शकतील.

(११) अपील प्राधिकरण योग्य ठरेल त्यावेळी कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर अपीलाची सुनावणी तहकूब करू शकेल.

(१२) अपील प्राधिकरण प्रतिवादी पक्षाचे लेखी म्हणणे किंवा निवेदन प्राप्त झाल्यापासून, शक्य तितके लवकर, नव्वद दिवसांच्या कालावधीत अपिलावर निर्णय घेऊ शकेल आणि नोंदणीकृत पोस्ट किंवा ईमेल किंवा फॅक्सद्वारे किंवा कायद्याने मान्य असलेल्या कोणत्याही मार्गाने आपला निर्णय सर्व संबंधित पक्षांना कळवेल.

परंतु असे की, जाब देणार पक्षकारांना किमान दहा दिवस आगाऊ नोटीस दिल्याशिवाय अपीलात कोणतीही सुनावणी केली जाणार नाही.

(१३) अपिल प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ५३ नुसार प्राप्त झालेल्या अपिलाच्या नोंदवही ठेवेल, ज्यामध्ये अनुक्रमांक, अपिलाचा नोंदणी क्रमांक आणि अपील नोंदणीची तारीख, अपीलकर्त्याचे नाव आणि विशेष शाळा / कार्यशाळा/ एमडीसी होम इत्यादी, जिल्हा नाव, अपील प्राप्त होण्याची तारीख, अपीलावरील निर्णयाची तारीख, निर्णयाचे स्वरूप इत्यादी बाबींचा समावेश असेल.

(१४) नोंदणी प्रमाणपत्र परत घेण्याचा/रद्द करण्याचा परिणाम.- आयुक्त, दिव्यांग कल्याण हे, ज्यांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे, त्या संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या अनुदानित शाळा/कार्यशाळेतील विद्यार्थी किंवा प्रशिक्षणार्थी आणि शिक्षक किंवा प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांना शक्यतो जवळच्या ठिकाणच्या, २५ किलोमीटरच्या आत आणि ५० किलोमीटर त्रिज्येच्या पलीकडे नाही, अशा इतर समान प्रकारच्या शाळा किंवा संस्थांमध्ये हस्तांतरित करतील. असे करताना आयुक्तांकडून जवळच्या शाळेची क्षमता तात्पुरती वाढवली जाईल आणि त्यानुसार ते विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी आणि शिक्षक/ कर्मचारी यांच्या तशा शाळांवर तात्पुरती नेमणूक करण्याकरीता आदेश पारित करतील.

प्रकरण -५

दिव्यांगत्वाचे प्रमाणीकरण

८.दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकरणाच्या निर्णयाविरूध्द अपिल.- (१) अपंगत्वाचे प्रमाणपत्र जारी करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, निर्णयाची माहिती मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, पदनिर्देशित अपील प्राधिकरणाकडे खालील प्रकारे अपील करू शकते:

(ए) अपिलामध्ये प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी आणि अपिलाची कारणे समाविष्ट असावीत;

(बी) प्रमाणिकरण करणाऱ्या प्राधिकरणाने दिलेल्या प्रमाणपत्राची अथवा प्रमाणपत्र नाकारण्याच्या आदेशाची प्रत अपिलासोबत संलग्न करणे आवश्यक आहे;

परंतु, दिव्यंगत्व असलेली अपिलार्थी व्यक्ती अज्ञान किंवा बौध्दीकदृष्ट्या दिव्यांग असल्यास आणि अर्ज करण्यास अपात्र किंवा अक्षम असल्यास, त्या व्यक्तीच्या वतीने त्या व्यक्तीचे नैसर्गिक अथवा कायदेशीर पालक त्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत अपिल करू शकेल.

(२) प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीचे दिव्यांगत्व संशयास्पद असल्याचे कोणत्याही आस्थापनेची खात्री पटल्यास त्याबाबतचे ज्ञान झाल्यापासून ती आस्थापना अपिलिय वैद्यकिय प्राधिकरणाकडे तीस दिवसांच्या आत अपिलाद्वारे दाद मागू शकेल.

(३) उपनियम (१) किंवा (२) अन्वये अपिल प्राप्त झाल्यानंतर, अपिलिय प्राधिकरण अपिलार्थीस म्हणणे सादर करण्याची संधी देईल आणि त्यानंतर उचित वाटेल असे सुस्पष्ट व कारणमिमांसात्मक आदेश पारीत करेल.

परंतु, अपिलिय वैद्यकिय प्राधिकरण हे स्वअधिकारात किंवा अन्य प्रकारे समाधानी झाल्यास, त्यास / तिला वैद्यक तज्ञाकडे संदर्भ करून किंवा अपिलिय प्राधिकरणाकडे आवश्यक सुविधा असल्यास संबंधित दिव्यांग व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून, दिव्यांगत्वाचे पुनर्निधारण करून घेईल आणि / किंवा प्राप्त वैद्यकीय अभिप्रायानुसार अपिल प्रकरणी उचित आदेश पारीत करेल.

परंतु, सदरचे दिव्यांगत्वाचे पुनर्निधारण हे अधिनियमातील कलम ५६ अन्वये केंद्र शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार असेल.

(४) उपनियम (१) किंवा (२) अन्वये प्राप्त झालेल्या अपिल दिनांकापासून साठ दिवसांच्या आत निर्णय घेतला जाईल.

(५) या नियमांच्या प्रारंभाच्या तारखेला अपील झाल्यास, अपील प्राधिकारी अपीलातील सर्व संबंधित पक्षांना नोटीस जारी करतील आणि या नियमांनुसार अपील निकाली काढतील.

प्रकरण — ६

दिव्यांगांचे राज्य सल्लागार मंडळ

९. *दिव्यांगांच्या राज्य सल्लागार मंडळातील अशासकीय सदस्यांना देय भत्ते.-* अधिनियमाच्या कलम ६६ च्या उप-कलम (२) च्या उप-खंड (i) आणि (ii) च्या खंड (e) अंतर्गत दिव्यांगांच्या राज्य सल्लागार मंडळावर नामनिर्देशित अशासकीय सदस्यांना मंडळाच्या बैठकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या गट-अ अधिकाऱ्याला देय असलेल्या भत्त्यानुसार प्रवास भत्ता देय राहील.

१०. मंडळाच्या कामकाजाची प्रक्रिया.-

(१) बैठकीची सुचना.- (ए) राज्य सल्लागार मंडळाची बैठक सामान्यपणे चेअरमन ठरवतील त्या वेळी व त्याठिकाणी घेण्यात येईल.

(बी) मंडळाचे अध्यक्ष मंडळातील किमान एक तृतीयांश सदस्यांच्या लिखित स्वरूपाच्या विनंतीवरून मंडळाची विशेष बैठक बोलावतील.

(सी) मंडळाचे सदस्य सचिव हे मंडळाच्या सामान्य बैठकीसाठी किमान पंधरा दिवसांची आणि विशेष बैठकीसाठी किमान पाच दिवसांची नोटीस मंडळातील सदस्यांच्या नावे जारी करतील. त्यामध्ये बैठकीचे ठिकाण, वेळ, बैठकीत चर्चा केल्या जाणाऱ्या विषयांची नोंद केली जाईल.

(डी) मंडळाच्या बैठकीची नोटीस सदस्यांना विशेष दुताद्वारे किंवा रजिस्टर पोस्टाने त्यांचे संबंधित निवासस्थान किंवा व्यवसायाच्या पत्यावर किंवा ईमेल संदेशाद्वारे किंवा मंडळाचे अध्यक्ष यांना योग्य वाटेल अशा पद्धतीने बैठकीची सुचना अध्यक्ष देतील त्यानुसार दिली जाईल.

(इ) सदस्यास मंडळासमोर एखादा विषय सदस्य सचिव यांना बैठकीपुर्वी किमान दहा दिवस आधी नोटीस देऊन मांडता येईल.

परंतु, अध्यक्ष यांना योग्य वाटल्यास ते पुर्व नोटीशीशिवाय एखादा विषय विचारार्थ ठेवण्यास मान्यता देऊ शकतील.

(२) पिठासन अधिकारी.- मंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये मंडळाचे अध्यक्ष हे पिठासन अधिकारी म्हणून उपस्थित असतील. अध्यक्षांच्या अनुपस्थित उपाध्यक्ष हे अध्यक्ष तथा पिठासन अधिकारी म्हणून बैठकीचे कार्य पार पाडतील, परंतु जेव्हा अध्यक्ष आणि उपाध्यक्षांचे दोघेही एखाद्या बैठकीस अनुपस्थित असतील तेव्हा मंडळाच्या उपस्थित सदस्यामधून एखादया सदस्याची अध्यक्ष तथा पिठासन अधिकारी म्हणून निवडले जाईल.

(३) गणपुर्ती.- (ए) मंडळाच्या बैठकीकरीता एकूण सदस्यांच्या दोन-तृतीयांश सदस्य बैठकीस उपस्थित असल्यास गणपुर्ती पूर्ण झाली असे मानण्यात येईल.

(बी) बैठकीमध्ये गणपुर्ती न झाल्यास अध्यक्ष काही तासांसाठी बैठक स्थगित करण्याचा निर्णय घेवू शकतील किंवा बैठकीसाठी पुढील दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करू शकतील. तहकूब करण्यात आलेल्या बैठकीसाठी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

(सी) मंडळाच्या नियमित किंवा विशेष बैठकीच्या अजेंड्यावर नसलेला कोणताही विषय मंडळाच्या स्थगित झालेल्या बैठकीत घेवून त्याच्यावर चर्चा केली जाणार नाही.

(४) इतिवृत्त.- (ए) सदस्य-सचिव हे मंडळाच्या बैठकांचे अभिलेखे जतन करतील व त्यामध्ये बैठकीस उपस्थित राहीलेल्या सदस्यांची नावे आणि बैठकीच्या कामकाजाच्या नोंदी ठेवतील.

(बी) मागील बैठकीचे इतिवृत्त हे पुढील प्रत्येक बैठकीच्या सुरुवातीला वाचून दाखविले जाईल व सदरील इतिवृत्तावर पिठासन अधिकारी हे स्वाक्षरी करतील.

(सी) मंडळाच्या कोणत्याही सदस्यास बैठकींमध्ये झालेल्या कामकाजाची माहितीसदस्य सचिव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत तपासणीसाठी उपलब्ध राहील.

(५) बैठकीचे कामकाज.- खंड (इ) उपनियम (१) उपनियम (५) अनुसार पिठासन अधिकारी यांनी परवानगी दिल्याखेरीज किंवा मंडळातील कोणत्याही सदस्यांनी नोटीस दिल्याखेरीज विषयसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या मुद्यावर बैठकीचे कामकाज केले जाणार नाही.

(६) राज्य सल्लागार मंडळाच्या बैठकीची विषयसुची.- मंडळाच्या कोणत्याही बैठकीत, पीठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीने बैठकीमध्ये अन्यथा निराकरण केल्याशिवाय, विषयसूचीमध्ये ज्या क्रमाने समावेश केला आहे त्या क्रमाने व्यवहार केला जाईल;

परंतु, मंडळाच्या बैठकीच्या सुरुवातीला किंवा बैठकीतील प्रस्तावावरील चर्चेच्या समाप्तीनंतर, पीठासीन अधिकारी किंवा मंडळाचा सदस्य विषयसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे कामकाजाच्या क्रमात बदल सुचवू शकतो. आणि मंडळाच्या अध्यक्षांनी सहमती दर्शवल्यास, असा बदल होऊ शकेल.

११. दिव्यांगत्वावरील जिल्हास्तरीय समितीची रचना.- *(१)* अधिनियमाच्या कलम ७२ अन्वये असलेल्या दिव्यांग व्यक्तीकरीता असलेल्या जिल्हास्तरीय समितीमध्ये खालील सदस्याचा समावेश असेल-

(i)	जिल्हाधिकारी	पदसिध्द अध्यक्ष;
(ii)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य;
(iii)	अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका	सदस्य;
(iv)	मुख्याधिकारी, संबंधित जिल्ह्यातील नगर पालिका किंवा नगर परिषद	सदस्य;
(v)	जिल्हा शल्यचिकित्सक	सदस्य;

(vi)	मुख्य वैद्यकीय अधिकारी	सदस्य;
(vii)	जिल्हा आरोग्य अधिकारी	सदस्य;
(viii)	जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे	सदस्य;
(xi)	संबंधित जिल्ह्यातील अग्रगण्य बँकेचे प्रतिनिधी	सदस्य;
(x)	अधिनियमातील परिशिष्टामध्ये असलेल्या विनिर्दिष्ट दिव्यांग प्रकारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांमधील पाच प्रतिनिधी त्यापैकी कमीत कमी दोन सदस्य हे नामनिर्देशाने नियुक्त दिव्यांग व्यक्ती असतील व एक सदस्य नामनिर्देशाने नियुक्त महिला असेल. जिल्हाधिकारी हे चेअरमन यांच्या अधिकारात समितीच्या अशासकीय सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करतील.	सदस्य;
(xi)	जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त समाज कल्याण	सदस्य सचिव;

अध्यक्ष हे निमंत्रित सदस्य म्हणून कोणत्याही तज्ञाला बोलावू शकतील.

(२) समितीतील अशासकीय सदस्यांचा कालावधी नियुक्तीपासून तीन वर्षांचा राहील.

१२. जिल्हा स्तरीय समितीची कार्ये.-

(१) दिव्यांग व्यक्तीकरीता असणारी जिल्हास्तरीय समिती खालील कार्ये पार पाडेल.-

(ए) जिल्हास्तरीय समितीच्या वर्षातून त्रैमासिक बैठका घेण्यात येतील.

(बी) दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसन व सक्षमीकरणाबाबत जिल्हा यंत्रणेस समिती सल्ला देईल.

(सी) अधिनियमातील तरतूदींच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करेल आणि आढावा घेईल.

(डी) जिल्हा नियोजन व विकास परिषद यांच्या कामकाजाचा आणि समुचित प्राधिकरणाने दिव्यांगांच्या कल्याणासाठी निर्धारित केलेल्या ५% निधीच्या खर्चाचे पर्यवेक्षण करेल व आढावा घेईल.

(इ) दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाच्या दिव्यांगांसाठीच्या योजनांची व कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना जिल्हा यंत्रणेला सहाय्य करेल.

(एफ) अधिनियमातील तरतुदींची जिल्हा प्रशासनाद्वारे अंमलबजावणी न करण्याबद्दलच्या तक्रारींची समिती दखल घेवून संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने सुयोग्य उपाययोजना करणेबाबत संबंधित प्राधिकरणास शिफारस करेल.

(जी) अधिनियमाच्या कलम २३ मधील उप-कलम (४) अंतर्गत शासकीय आस्थापनांवरील कर्मचा-यांवर जिल्हा प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे व्यथित झालेल्या शासकीय कर्मचा-याने केलेले तक्रारीची समिती दखल घेईल व अशा अपीलावर सुयोग्य उपाययोजना करणेबाबत शिफारस करेल.

(एच) राज्य शासनाने नेमून दिलेली अन्य प्रकारची कार्ये.

(२) समितीच्या त्रैमासिक बैठकांचा अहवाल इतिवृत्तासह जिल्हा स्तरीय समिती प्रत्येक बैठकीपासून पंधरा दिवसांच्या आत राज्य आयुक्त दिव्यांग कल्याण यांना सादर करेल.

प्रकरण — ७

दिव्यांगांसाठी राज्य आयुक्त

१३. राज्य आयुक्त, अधिकारी व कर्मचाऱ्यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवा शर्ती.- (१) राज्य आयुक्त यांचे वेतन व भत्ते आणि सेवा शर्ती या महाराष्ट्र शासनातील भारतीय प्रशासन सेवेतील केडर प्रमाणे राहतील.

(२) महाराष्ट्र शासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व भत्ते आणि सेवा शर्ती राज्य आयुक्त यांचे अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहतील.

१४. राज्य आयुक्त यांना सहाय्य करणारी सल्लागार समिती.- (१) राज्य शासन हे राज्य आयुक्त यांना सहाय्य करणाऱ्या सल्लागार समितीची स्थापना करेल. सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे समावेश असेल.-

(ए) दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या तीन तज्ञांची नियुक्ती राज्य सरकारकडून केली जाईल.

(बी) राज्य आयुक्त दिव्यांग कल्याण हे आवश्यकतेनुसार विषय किंवा क्षेत्र तज्ञांना आमंत्रित करू शकतील, जे त्यांना बैठक किंवा सुनावणी आणि अहवाल तयार करण्यात सहाय्य करतील.

(२) सल्लागार समितीतील सदस्यांचा कालावधी हा तीन वर्षांचा असेल व त्यांना पुनर्नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.

(३) महाराष्ट्र शासनातील गट — अ दर्जाच्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेयतेप्रमाणे सल्लागार समितीच्या सदस्यांना प्रवासभत्ता देय राहील.

१५. *राज्य आयुक्तांनी सादर करावयाचा वार्षिक अहवाल.- (१)* राज्य आयुक्त हे, आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर परंतु पुढील वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या ३० तारखेपुर्वी राज्य सरकारला वार्षिक अहवाल तयार करून राज्य शासनास संबंधित आर्थिक वर्षात झालेल्या विविध कार्यक्रमाच्या बाबतची सविस्तर माहिती शासनास सादर करतील.

(२) विशेषत:, उप-नियम (१) मध्ये नमुद केलेला वार्षिक अहवाल ठराविक विहित नमुन्यामध्ये राहील व त्यामध्ये स्वतंत्र बाबींची माहिती वेगवेगळ्या शिर्षकाखाली समाविष्ट करून प्रत्येक बाबींचा सविस्तर माहिती खालीलप्रमाणे क्रमानुसार सादर करण्यात येईल.-

(ए) राज्य आयुक्त यांच्या कार्यालयातील कार्यरत अधिकारी आणि कर्मचा-यांची नावे कार्यालयीन पदाची रचना दर्शविणारा तक्ता;

(बी) अधिनियमांतर्गत राज्य आयुक्तांना अधिकार देण्यात आलेली कामे आणि यासंदर्भातील कामगिरीचे ठळक मुद्दे;

(सी) राज्य आयुक्त यांनी केलेल्या मुख्य शिफारशी;

(डी) अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत केलेली प्रगती;

(इ) राज्य आयुक्त यांना योग्य वाटेल त्या बाबी किंवा शासनाने सदर अहवालात समाविष्ट करावयाच्या वेळोवेळी सुचित केलेल्याबाबींचा समावेश करेल.

प्रकरण — ८

विशेष सरकारी अभियोक्ता

१६. *विशेष सरकारी वकीलांचे शुल्क व इतर मानधन.-* अधिनियमाच्या कलम ८५ च्या पोट-कलम (१) अंतर्गत निर्दिष्ट किंवा नियुक्त केलेल्या विशेष सरकारी वकिलाचे शुल्क आणि इतर मानधन हे राज्य सरकारने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे राहील.

प्रकरण — ९

राज्य दिव्यांग निधी

१७. अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये राज्य दिव्यांग निधी स्थापना व त्याचे व्यवस्थापन.- (*१*) दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य निधी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या निधीची स्थापना केली जाईल.

(*२*) खालील गोष्टी राज्य निधीमध्ये जमा केल्या जातील आणि त्याचा भाग बनतील:-

(*ए*) या उद्देशासाठी राज्य सरकारकडून प्राप्त झालेली रक्कम;

(*बी*) या उद्देशासाठी प्राप्त अनुदान,भेटवस्तू, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत प्राप्त निधी, देणग्या, लाभ, मृत्युपत्र किंवा हस्तांतरणाद्वारे प्राप्त झालेल्या सर्व रक्कमा;

(*सी*) राज्य सरकार ठरवू शकतील अशा इतर स्त्रोतांकडून प्राप्त झालेल्या सर्व रकमा;

(*३*) राज्य निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी खालील सदस्यांचा समावेश असलेले एक नियामक मंडळ असेल, म्हणजे:-

(*ए*) सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन - अध्यक्ष;

(*बी*) सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन — सदस्य;

(*सी*) सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन — सदस्य;

(*डी*) आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य— सदस्य सचिव;

(*४*) नियामक मंडळ आवश्यक तितक्या वेळा परंतु प्रत्येक आर्थिक वर्षातून एकदा तरी बैठक घेईल.

(*४*) सदस्य-सचिव, राज्य निधीशी संबंधित सर्व व्यवहार पार पाडतील आणि आयुक्तालयाचे लेखाधिकारी त्यासंबंधी योग्य हिशोब ठेवतील.

१८. राज्य निधीचा वापर.- (*१*) राज्य निधीचा विनियोग हा खालील दिलेल्या उद्दीष्टांकरीता केला जाईल-

(*ए*) दिव्यांगांच्या पुनर्वसनात्मक आणि कल्याणकारी समूह आधारित कार्यक्रमांकाच्या अंमलबजावणी करीता व त्या अनुषंगाने केंद्र सरकार, राज्य सरकार, वित्तीय संस्था अथवा स्थानिक संस्थाव्दारा कार्यान्वित कोणत्याही योजनांमध्ये विविक्षितरित्या समाविष्ट नसलेल्या, पुरेशी वित्त उपलब्धी नसलेल्या कार्यक्रमांना वित्तिय सहाय्याकरीता;

(*बी*) अधिनियम व या नियमांनुसार दिव्यांग व्यक्तींचा समग्र वृध्दी, विकास आणि कल्याणासाठी करावयाच्या इतर कार्यक्रमांकरीता किंवा प्रक्रियेकरीता;

(*सी*) उपरोक्त उद्देशांसाठी आणि अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीच्या उद्देशाने अनुषंगिक आणि अनुकूल असलेल्या इतर सर्व गोष्टी करणे;

(*डी*) नियामक मंडळाने ठरविलेल्या इतर कोणत्याही उद्देशांकरीता;

(*इ*) या कायद्यांतर्गत होणारा राज्यनिधीसाठी प्रशासकीय अथवा इतर खर्च.

(*२*) खर्चाचा प्रत्येक प्रस्ताव नियामक मंडळापुढे मान्यतेसाठी सादर केला जाईल.

(*३*) नियामक मंडळ हे योग्य वाटल्यास आवश्यकता व गरज विचारात घेऊन निधीचे व्यवस्थापन व विनियोगाकरीता आवश्यक तो कर्मचारी वर्ग नियुक्त करू शकेल.

(*४*) शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्यानुसार राज्य निधीतून गुंतवणुक केली जाईल.

१९. विनियोगाची कार्यपध्दती.- (*१*) राज्य निधीचा खालीलप्रमाणे विनियोग केला जाईल :-

(*ए*) दिव्यांगांचा राज्य निधी नियामक मंडळाकडून मंजूर केला जाईल.

(*बी*) संबंधित जिल्हास्तरीय समितीने, मागणीचे पैलू आणि त्यात मागितलेले सवलत विचारात घेऊन, त्यांचे स्तरावर योग्य छाननीसह, प्रस्ताव प्राप्तीपासून तीस दिवसांच्या आत राज्य आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्यामार्फत संबंधित प्रशासकीय विभागाकडे नेमक्या शिफारशींसह सादर करावेत.

(*सी*) जिल्हास्तरीय समितीकडून हा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, संबंधित प्रशासकीय विभागाने तो प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, दिव्यांग व्यक्तींसाठीच्या राज्य निधीच्या नियामक मंडळाकडे, आवश्यक निधी मंजूर करण्यासाठी योग्य टिप्पण्या आणि शिफारशींसह सदरचा प्रस्ताव पाठवावा;

परंतु, संबधित प्रशासकीय विभागाने त्यांचे विभाग स्तरावर प्रस्तावांची छाननीची प्रक्रिया, शिफारशीं इ. बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक राहील.

(*डी*) नियामक मंडळ प्रस्ताव प्राप्तीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत गुणवत्तेनुसार निर्णय घेईल.

परंतु, नियामक मंडळ सदर प्रस्ताव सकारण नाकारू शकेल.

परंतु सदरच्या निधीचे वितरण हे शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या मानकांप्रमाणे असेल.

स्पष्टीकरण — १ : संबंधित निधी वैद्यकीय मदतीच्या स्वरूपात असल्यास राज्य दिव्यांग निधीचे नियामक मंडळ सदरचा निधी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे संबंधित दिव्यांग व्यक्तीच्या नावाने वितरीत करेल.

स्पष्टीकरण — २: संबंधित निधी सुगम्यता या कारणाकरीता असल्यास राज्य दिव्यांग निधीचे नियामक मंडळ सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे संबंधित परिसरातील सुगम्य बांधकामाकरीता वितरीत करेल.

२०. *अर्थसंकल्प.-* राज्य निधीचे सदस्य सचिव प्रत्येक आर्थिक वर्षासाठी प्रत्येक जानेवारी महिन्यात राज्य निधीचा अंदाजित जमा व खर्चाचा उल्लेख असलेली अर्थसंकल्पीय तरतुद तयार करुन ती नियामक मंडळाच्या विचारार्थ सादर करतील.

२१. *वार्षिक अहवाल.-* सदस्य सचिव हे राज्य निधीचा अहवाल तयार करून सदरचा अहवाल नियम १५ नुसारच्या वार्षिक अहवालामध्ये समावेश करतील.

नमुना - १

(पहा नियम ४(२)(अ) आणि (ब))

दिव्यांग व्यक्ती, पालक, नातेवाईक किंवा नोंदणीकृत संस्थेने पदनिर्देशित प्राधिकरणाकडे करावयाच्या मर्यादित पालकत्व नियुक्तीकरिताच्या अर्जाचा नमुना.

दिनांक:

प्रति,
जिल्हाधिकारी (पदनिर्देशित प्राधिकारी)

महोदय/महोदया,
-------- (दिव्यांग व्यक्तींचे पूर्ण नांव) ही दिव्यांग व्यक्ती असून आणि या दिव्यांग व्यक्तीस कायदेशीर दृष्टया बंधनकारक असणारे निर्णय घेण्यासाठी मर्यादित पालकत्वाची आवश्यकता आहे. ....(मर्यादित पालकत्वाची मागणी करण्याचे कारण नमुद करावे.) मी / आम्ही याद्वारे विनंती करतो की _____ दिव्यांग व्यक्तीची ---------- महिन्याच्या कालावधीकरिता मर्यादित पालक म्हणून नियुक्ती करावी. (कालावधी महिन्यामध्ये नमुद करावा.)

आम्ही खालील सविस्तर तपशील अर्जासोबत जोडत असून त्यानूसार लवकर पालकत्वाबाबत निर्णय घेण्याबाबत विनंती करतो.

१. दिव्यांग व्यक्तीचा तपशील: -
   (१) दिव्यांग व्यक्तीचे नाव:
   (२) संपूर्ण पोस्टाचा पत्ता:
   (३) वय:
   (४) पुरुष/स्त्री/तृतीय पंथी :
   (५) दिव्यांगत्वाचा प्रकार आणि दिव्यांगत्वाची टक्केवारी:
   (दिव्यांगत्व प्रमाणपत्राची स्व-साक्षांकित प्रत जोडावी.
   (६) ओळखपत्र क्रमांक/यूडीआयडी क्रमांक:
   (स्व-साक्षांकित प्रत जोडावी.)
   (७) आधार कार्ड क्रमांक.
   (स्व-साक्षांकित प्रत जोडावी.)
   (८) संपर्क क्रमांक:
   (i) दुरध्वनी क्रमांक:
   (ii) भ्रमणध्वनी क्रमांक:

(iii) ईमेल असेल तर पत्ता :

२. अर्जदाराचा तपशील: -

(१) अर्जदाराचे नाव:

(२) संपूर्ण पोस्टाचा पत्ता:

(३) वय:

(४) लिंग: पुरुष / स्त्री / तृतीय पंथी.

(५) दिव्यांग व्यक्तीशी असलेले नातेसंबंध:

(६) अर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक:

(स्व-साक्षांकित प्रत जोडावी.)

(७) संपर्क क्रमांक:

(i) दूरध्वनी क्रमांक:

(ii) भ्रम्नध्वनी क्रमांक:

(iii) ईमेल असेल तर पत्ता:

३. मर्यादित पालक म्हणून नियुक्ती द्यावयाच्या प्रस्तावित व्यक्ती किंवा नोंदणीकृत संस्थेचा तपशील: -

(१) मर्यादित पालकत्वासाठी प्रस्तावित व्यक्ती/संस्थेचे नाव:

(२) संपूर्ण पोस्टाचा पत्ता:

(३) वय:

(संस्थेच्या बाबतीत स्थापनेचा दिनांक विचारात घेण्यात यावा):

(४) पुरुष/स्त्री/तृतीयपंथी :

(५) दिव्यांग व्यक्तीशी असलेले नातेसंबंध:

(६)अर्जदाराची सविस्तर माहिती:

(अर्जदार व्यक्ती किंवा नोंदणीकृत संस्था असल्यास त्यांचे आधार कार्ड आणि पॅनकार्डाची स्वयं-साक्षांकित प्रत संलग्न करावी)

(७) संपर्क क्रमांक:

(i) दूरध्वनी क्रमांक:

(ii) भ्रम्नध्वनी क्रमांक:

(iii) ईमेल असेल तर पत्ता:

(८) मर्यादित पालकत्व मिळविण्याचा उद्देश स्पष्ट करण्यात यावा:

(कृपया कागदपत्रे असल्यास संलग्न करावीत)

(9) मर्यादित पालकत्व मिळण्याचा आवश्यक कालावधी:

(10) मर्यादित पालकत्व मिळण्याच्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीची सविस्तर माहिती द्यावी.

(कृपया थोडक्यात संक्षिप्त स्पष्टीकरण करा)

(अ) मर्यादित पालक म्हणून नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तीची संमती :

मी/आम्ही याद्वारे _____इतक्या कालावधीसाठी _____ _____ _____या दिव्यांग व्यक्तीचा मर्यादित पालक होण्यास संमती देतो आणि माझे/आमचे मर्यादित पालकत्वाचे दायित्व योग्य रित्या परिश्रमपूर्वक पार पाडू अशी हमी देत आहे.

स्वाक्षरी
अर्जदार / दिव्यांग व्यक्ती.

स्वाक्षरी
प्रस्तावित मर्यादित पालक.

(ब) दिव्यांग व्यक्तीच्या पालकाची / कायदेशीर पालकांची संमती

मी/आम्ही याद्वारे ---------- या दिव्यांग व्यक्तीचा _____ च्या कालावधीसाठीचे मर्यादित पालकत्व स्वीकारण्यास संमती देत आहे.

स्वाक्षरी
दिव्यांग व्यक्तीचे पालक / कायदेशीर पालक.

नमुना - २

(पहा नियम ४ उप-नियम (२) खंड (फ))

नियुक्त प्राधिकरणाद्वारे मर्यादित पालकांच्या नियुक्तीच्या समर्थनार्थ खातरजमा करणेबाबतचा अर्ज

मी श्री/श्रीमती/कुमारी ---------- (*अधिकाऱ्याचे नांव*), जिल्हाधिकारी ---------- (*जिल्ह्याचे नांव*) या जिल्ह्यातील ---------- (*दिव्यांग व्यक्तीचे / अर्जदार / संस्था /पालक/ नातेवाईक यांचे नांव*)यांनी केलेल्या अर्जाचा विचार करून याद्वारे ----------(*दिव्यांग व्यक्तीचे नांव*) यांची मर्यादित पालक म्हणून श्री/श्रीमती ---------- ----- ------- ---------- (*दिव्यांग व्यक्तीचे नांव*)यांचेकरिता महिनेइतक्या कालावधी साठी ---------- यांचेबाबतीत कायदेशीर दृष्टया बंधनकारक निर्णय घेण्याच्या दृष्टीने नियुक्ती करीत आहे. मर्यादित पालकत्वाची जबाबदारी खाली यादीनुसार राहील.

बांधीलकी:

(i).....

(ii) .....

(iii) .....

मर्यादित पालक आणि दिव्यांग

व्यक्तीचा संयुक्त फोटो

ठिकाण:-

तारीख: -

नियुक्त प्राधिकरणाची स्वाक्षरी

मुद्रांक/सील.

नमुना - ३

(पहा नियम ४ उप-नियम (४))

(मर्यादित पालकाकडून घ्यावयाच्या अहवालाचा नमुना.)

या तारखेपासून: दिनांक:

प्रति,

जिल्हाधिकारी (पदनिर्देशित प्राधिकारी)

महोदय/महोदया,

माझी ---------- यांचे मर्यादित पालक म्हणून _____ या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

मी याद्वारे मर्यादित पालक म्हणून निश्चित केलेल्या जबाबदाऱ्यांच्या पूर्ततेबाबतचा अहवाल सादर करत आहे.

१) दिव्यांग व्यक्तीसाठी खरेदी केलेल्या जंगम/स्थावर मालमत्तेचा तपशील आणि गुंतवणुकीचा तपशील:

तक्ता - अ (खरेदी केलेल्या मालमत्तेचे वर्णन करा)

अ. क्र.	मालमत्तेचे नाव	खरेदीचा दिनांक	किंमत	अदा केलेली रक्कम	खेरदी कोणाकडून केली

टेबल —ब (खरेदी केलेल्या गुंतवणुकीचे वर्णन करा)

अ.क्र.	गुंतवणुकीचे सविस्तर नाव		गुंतवणुकीचा दिनांक	गुंतवणुकीचे मुल्य	गुंतवण्यात आलेली रक्कम
	नाव	संख्या			

२) दिव्यांग व्यक्तीद्वारे करण्यात आलेल्या खर्चाचा सविस्तर तपशील :----------

३) दिव्यांग व्यक्तीच्या वतीने घेण्यात आलेल्या कायदेशीर निर्णयांचा सविस्तर तपशील :----------

४) इतर तपशील असल्यास त्याची माहिती द्यावी :---------- ----------

स्वाक्षरी

दिव्यांग व्यक्तीचे मर्यादित पालक

तारीख:

ठिकाण:

नमुना- ४
(पहा नियम ६ उप-नियम (१))
नोंदणी/नूतनीकरण प्रमाणपत्रासाठी अर्ज

दिनांक :

प्रति,
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त
दिव्यांग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
द्वारा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, .../
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग,
मुंबई शहर / मुंबई उपनगर
(जे लागू नाही ते काढून टाकावे)

विषय - **नवीन नोंदणी प्रमाणपत्र / नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनिकरणाचा अर्ज.**

(१) स्वयंसेवी संस्थेचे/ कंपनीचे/ ट्रस्टचे नाव आणि पत्ता:
दूरध्वनी/भ्रम्नध्वनी नंबर आणि कार्यालयीन ईमेल:
(२) कोणत्या स्वयंसेवी संस्थेच्या उपक्रमाकरिता अर्ज केला आहे त्याची माहिती:
(a) नाव:
(b)पत्ता (कार्यालय / प्रकल्प):
(c)फोन / फॅक्स / टेलेक्स / (ऑफिस):
(d) ईमेल आयडी:
(३) प्रकल्प / उपक्रमाचा प्रकार (खालील यादीमधून निवडण्यात यावा):
(i) ६ वर्षांखालील मुलांसाठी अर्ली इंटरव्हेंशन सेंटर / डे केअर सेंटर.
(ii) विशेष शाळा (अनुदानित);
(iii) विशेष शाळा (विनाअनुदानित);
(iv) एकात्मिक शाळा;
(v) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र,संलग्न कार्यशाळा;
(vi) १८ वर्षाखालील मुलांसाठी निवासी केंद्र
(vii) १८ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांसाठी निवासी केंद्र / समूह गृह
(viii) शासन पुरस्कृत बाल कल्याण समिती नियंत्रित मतिमंद मुलांचे बालगृह

(ix) दिव्यांग व्यक्तींकरिता समुदाय आधारित पुनर्वसन प्रकल्प

(x) दिव्यांग व्यक्तींच्या विवाहासाठी सहाय्य करणारे उपक्रम, दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने तसेच सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणांचे वितरण, व्यंग सुधारक शस्त्रक्रिया व विविध उपचार पध्दती (थेरपीज्) च्या अनुषंगाने नियमित किंवा शिबिरांद्वारे राबविण्यात येणारे उपक्रम. बौद्धिक दिव्यांग व्यक्तींसाठी जागरुकता विषयक शिबिरे आयोजित करणारे उपक्रम. दिव्यांग व्यक्तींना विधी विष्यक सल्ला देणे बाबत कामकरणारे उपक्रम. दिव्यांग व्यक्तींशी संबंधित क्षेत्रात संशोधन आणि तंत्रज्ञान स्विकृती करणारे उपक्रम. (लागू असेल तर अधोरेखित करा.);

(xi) इतर कोणतेही कार्यक्रम जे सक्षम अधिकारी यांना योग्य वाटतील.

(xii) उपक्रमाचे सविस्तर वर्णन: ---------- -

(४) (i) यापुर्वी अर्जदार/संस्थेची नोंदणी करण्यात आलेल्या कायद्यांची नावे:

(a) ---------- ---

(b) ---------- ---

(c) ---------- ---

(ii) यापुर्वी नोदंणी करण्यात आलेल्या प्रमाणपत्राचे नोंदणी क्रमांक, नोंदणीची तारीख आणि उद्देश :

(a) ---------- ---

(b) ---------- ---

(c) ---------- ---

(कृपया प्रत संलग्न करा)

(५) संस्थेची घटना, उपविधी आणि नियमावली संलग्न आहे काय?

होय /नाही. (हो असल्यास, कृपया प्रत संलग्न करा)

(६) दिव्यांग व्यक्तींना सेवा विषयक देऊ केलेल्या पायाभूत सुविधांबाबत स्वयंघोषणा पत्र

- याबाबतची सविस्तर माहिती स्वतंत्र पणे प्रतिज्ञापत्राद्वारे द्यावीत.

(७) नोंदणी शुल्क अथवा नूतनीकरण शुल्काच्या देयकाचा सविस्तर तपशील :

(पावतीची प्रत जोडण्यात यावी.)

(८) इतर आवश्यक माहिती आणि संलग्न करावयाच्या कागदपत्रांची यादी जोडण्यात यावी.

ज्यामध्ये व्यवस्थापकीय समिती सदस्य / विश्वस्त आणि पदाधिकाऱ्यांची नावे, वय, आधार क्रमांक, संस्थेमध्ये कार्यरत असल्याचा कालावधी, दिव्यांग क्षेत्रात काम करण्याचा एकूण वर्षांचा अनुभव, गुन्हे दाखल अथवा शिक्षा झाली याबाबतची माहिती तसेच सद्यस्थितीतील न्यायालयीन प्रकरणे यांची माहिती मा. धर्मादाय आयुक्त यांनी शेडुल १ नुसार निर्गमित केलेल्या व्यवस्थापकीय समिती सदस्य / विश्वस्त पदाधिकारी यांचे बाबत देण्यात यावी.

(ए) अद्यावत वार्षिक अहवालाची प्रत. ज्यामध्ये केलेल्या कार्याचा उल्लेख राहिल. (आर्थिक वर्ष नमुद करा)

(बी) मागील तीन आर्थिक वर्षांतील सनदी लेखापालाने रीतसर प्रमाणित केलेल्या खात्यांचे लेखापरीक्षन विषयक विवरण.

(i) जमा आणि खर्च खाते
(मागील तीन वर्षांचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले).
(ii) उत्पन्न आणि खर्च खाते
(मागील तीन वर्षांचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले).
(iii) मागील तीन वर्षांचा ताळेबंद
(मागील तीन वर्षांचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले).

(सी) निधी संकलनाचा अपेक्षित स्रोत व पुढील ३ वर्षांकरिता निधी खर्चन्याचे भाकीत.

(डी) कार्य करण्याचे क्षेत्र (जेथून लाभार्थी मिळणे अपेक्षित आहेत).

(इ) वास्तूची माहिती (मालकीची आहे, भाडेतत्त्वावर आहे, लांब भाडेपट्टीवर आहे / वास्तूचे क्षेत्र/ क्षेत्र वापरण्यासाठी केलेले नियोजन), (स्वयं-साक्षांकित पुरावा सादर करावा.)

(एफ) तक्रार/अपील/सरकारच्या विरोधात दाखल केलेले न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणीही संस्थे विरोधात दाखल केलेले न्यायालीयन प्रकरण याची माहिती.

(जी) नोंदणी/नूतनीकरण प्रमाणपत्राची प्रत.

(9) सर्व नोंदणीकृत संस्थांनी लाभार्थ्यांसाठी खालील माहिती सुस्पष्ट ठिकाणी प्रदर्शित करावी.

(ए) विद्यार्थी/निवासी/ दिव्यांग लाभार्थ्यांना आकारल्या जाणाऱ्या शुल्काची सविस्तर माहिती. (याबाबत स्वतंत्र प्रपत्राद्वारे माहिती द्यावी.)

(बी)तक्रारींच्या निवारण करण्यासाठी आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी क्र.

अर्जदाराची स्वाक्षरी.

नाव:
पदनाम:
पत्ता :
तारीख:
ऑफिस स्टॅम्प:

नमुना - ५
(नियम ६ (८) पहा)
महाराष्ट्र शासन

दिव्यांग कल्याण विभाग,
दिव्यांग कल्याण आयुक्तालय,
३, चर्च रोड, महाराष्ट्र राज्य,
पुणे — ४११००१.

नवीन नोंदणी/नूतनीकरणाचे प्रमाणपत्र
दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ५१ आणि
महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, २०२३ मधील
नियम ६ अन्वये निर्गमित करण्यात आलेले प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक ..... (वर्ष) ..... दिनांक: / /

प्रमाणित करण्यात की, _____ (नोंदणीकृत संस्थेचे नाव) ने दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५१ च्या पोट-कलम (२) व त्याखाली बनवलेल्या नियमानुसार नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक त्या औपचारिकता आणि प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत.

नोंदणीकृत संस्थेचा तपशील, संस्थेचे इतर उपक्रम/प्रकल्प याबाबत तपशील संस्थेचा अधिकृत प्रतिनिधी याबाबतचा तपशील :-

१. संस्थेचे नाव, नोंदणीकृत पत्ता, वेबसाईट, ईमेल आयडी :

_____

२. संस्थेचे उपक्रम / प्रकल्पांचे स्वरूप व नाव, नोंदणीकृत पत्ता आणि ईमेल आयडी :

_____

३. संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीचे पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी: _____

_____ _____

